भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक ०५.१०.२०१९ ते ०९.१०.२०१९)

| अंक ८०/२०१९ | दिनांक ०४.१०.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२८/०९/२०१९ ते ०४/१०/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता ०५/१०/२०१९ ते ०९/१०/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८/०९ | २९/०९ | ३०/०९ | ०१/१० | ०२/१० | ०३/१० | ०४/१० | दिनांक | ०५/१० | ०६/१० | ०७/१० | ०८/१० | ०९/१० |
| ०.९ | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ३ | १५ | २० | २० | १४ |
| ३३.० | ३३.० | ३३.० | ३३.५ | ३४.० | ३५.० | ३५.० | कमाल तापमान (अं. से) | ३३ | ३५ | ३३ | ३३ | ३३ |
| २३.० | २३.० | २३.० | २३.० | २३.० | २३.५ | २४.५ | किमान तापमान (अं. से) | २५ | २६ | २६ | २६ | २५ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | सकाळ — मेघाच्छादन (ऑक्टा.) | ६ | ६ | ६ | ७ | ८ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | दुपार — मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९१ | ९२ | ९२ | ९० | ९२ | ९२ | ९३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९३ | ९२ | ९३ | ९२ | ९१ |
| ५५ | ५६ | ६७ | ८५ | ५८ | ६२ | ७७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६३ | ६० | ६६ | ६७ | ७३ |
| १.३ | १.३ | ०.९ | ०.३ | ०.९ | १.० | १.० | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००५ | ००४ | ००४ | ००३ | ००६ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ — वा-याची दिशा | पूर्वे कडून | ईशान्ये कडून | आग्नेये कडून | पूर्वे कडून | पूर्वे कडून |
| पश्चिमे | पश्चिमे | पश्चिमे | आग्नेये | आग्नेये | पश्चिमे | आग्नेये | दुपार — वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ४२२४.२ | ४२२४.२ | ०.९ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्हयात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता असुन वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | दाणे भरण्याची अवस्था | भातामध्ये लोंबीवरील ढेकण्याचा व लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असुन नियंत्रणासाठी मिथील पॅरराथिऑन २% भुकटी २० किलो प्रती हेक्टरी धुरळावी.<br>जिल्हयात काही ठिकाणी हळव्या जातीच्या भात पिकांची कापणी करण्यात आली असून कापलेल्या भाताच्या पेंड्या झाकुन ठेवण्यात याव्यात व ज्यांना कापणी करावयाची आहे त्यांनी पाऊसाचा अंदाज पाहून कापणी करावी.<br>भातामध्ये लोंब्या येण्यापूर्वी १० दिवस व लोंब्या आल्यानंतर १० दिवसांपर्यंत शेतातील पाण्याची पातळी १० सेमी ठेवावी. पिकातील दाणे भरेपर्यंत पाण्याची पातळी ५ सेमी ठेवावी. त्यानंतर कापणीपूर्वी ८ ते १० दिवस शेतातील पाणी काढावे.<br>भातावर करपा रोगाचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास नियंत्रणासाठी ट्रायसायक्लोझॉल ७५% पा. मि. भुकटी १० ग्रम किंवा आयसोप्रोथिऑलिन ४०% प्रवाही १० मिली प्रति १० लि. पाण्यातून फवारावे.<br>भातामध्ये तपकिरी तुड्तुड्यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असुन नियंत्रणासाठी ईमिडाक्लोप्रिड १७.८% १०० मिली प्रति ५०० लि. पाण्यातून फवारावे.<br>कापणीसाठी तयार झालेल्या भातावर कोणतीही फवारणी करु नयेत. |
| भुईमुग | आरा अवस्था | भुईमूगावर पाने पोखरणा-या अळीचा प्रादुर्भाव आढळून येण्याची शक्यता आहे. आढळून आल्यास क्विनॉलफॉस २५% प्रवाही १००० प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून १ हेक्टर क्षेत्रावर फवारणी करावी. |
| आंबा | पालवी पुर्व | आंबा पालवीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास नियंत्रणासाठी आवश्यकतेनुसार प्रोपिनेब ०.२ % (२० ग्र. /१० लि. पाणी) या बुरशिनाशकाची फवारणी घ्यावी.<br>आंब्यामध्ये नविन पालवी आली असल्यास त्या पालवीचे तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणारी अळी आणि मिजमाशीपासून आवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी २५% प्रवाही डायमिथोएट किंवा ३६% प्रवाही मोनोक्रोटोफॉस ११ मिलि प्रति १० लि पाण्यात मिसळुन फवारणी करावी.<br>आंब्यावर फांदेमर रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराइड ०.३% (३० ग्रम/१० ली. पाणी) किंवा ०.१% बोर्डो मिश्रण यापैकी एका बुरशीनाशकाची पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. फांदेमर रोगाने मोठ्या फांद्यामधुन डिंक येत असल्यास रोगग्रस्त साल तासुन त्याठिकाणी बोर्डो मिश्रणाची पेस्ट किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइडची पेस्ट लावावी. |
| काजु | पालवी पुर्व | काजुवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी.लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>सततच्या व अति पावसामुळे काजु पिकावर अचानक पानगळ/पानकुज आणि फांद्या वाळण्याची समस्या निर्माण झाली आहे.<br>रोगग्रस्त बागेतील रोगामुळे गळून पडलेली पाने बागेपासुन दूर अंतरावर खोल खड्ड्यात गाडुन टाकावीत. त्याचबरोबर रोगाने बाधित झालेल्या फांद्या कापुन काढाव्यात व त्यावर त्वरीत बोर्डोपेस्टचा लेप द्यावा.<br>पानगळ/पानकुज रोग नियंत्रणासाठी मेटॅलॅक्झील ८%+मॅन्कोझेब ६४% हे बुरशीनाशक १० लिटर पाण्यात २० ग्रॅम या प्रमाणात मिसळुन फवारणी करावी. |
| भाजीपाला | फळधारणा | नवीन वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासुन संरक्षण करावे.वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासुन संरक्षण करण्यासाठी मॅलॅथिऑन २ मि.ली. किंवा डायमिथोएट १.५ मि.ली. प्रती लीटर पाण्यात मिसळुन १०-१५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. |
| दुभती जनावरे, शेळ्या व कुक्कुटपालन | - | जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ कोमट पाणी व खाण्यासाठी हिरव्या ओल्या चा-याची व्यवस्था करावी.<br>पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली गाई व म्हशींना पायलाग रोग प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे.<br>पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली शेळ्यांना पी.पी.आर (माथा) रोग प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे. कोंबड्यांचे उन्हापासून संरक्षण करावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|